


शिवकृपा पतपेढीच्या १ हजार कोटींच्या संकल्पपूर्तीचा फलक अनावरण करताना अविनाश धर्माधिकारी, अविनाश भोसले, हणमंत गायकवाड, पंढरीनाथ भोसले, चंद्रकांत वंजारी, कृष्णा शेलार, भीमराव बोराडे, बाळासाहेब मोहिते, पांडुरंग घाडगे.

# अर्थकारणास आध्यात्माची जोड देण्याची गरज - अविनाश धर्माधिकारी

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) - सहकार चळवळ जोपासत अर्थकारणास आध्यात्माची जोड देणारी शिवकृपा पतपेढी ही राज्यात समाजाभिमुख, आदर्श पतसंस्था ठरल्याचे गौरवोद्‌गार पुण्याच्या चाणक्य मंडळाचे संचालक आणि माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी येथे काढले.

शिवकृपा सहकारी पतसंस्थेने एक हजार कोटींचा संमिश्र व्यवसायपूर्तीनिमित्त ठेवीदार, संस्थेचे पदाधिकारी, ठेव संकलन प्रतिनिधी यांचा आनंदमेळा चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित केला होता. या मेळाव्यात धर्माधिकारी बोलत होते. ज्या पतसंस्थेत दररोजच्या कामाची सुरुवात प्रार्थनेने होते व ज्या पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांचे आचार-विचार हे शिवसाधनेवर आधारलेले आहेत, त्यांना बाहेरून नियंत्रणाची जरुरीच नाही, असे धर्माधिकारी म्हणाले. यावेळी वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपसंचालक अशोक भांडवलकर उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष अविनाश भोसले म्हणाले की, हजार कोटींचा टप्पा गाठून देणाऱ्या कर्मचाऱ्यांची संस्था ऋणी आहे. त्यांच्या जीवनात सुवर्णयुग आणण्याचा संस्थेचा कायमचा प्रयत्न असेल.

संस्थेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी म्हणाले, संस्थेशी संबंधित सर्वांच्या सहकार्यामुळेच संस्था आज उज्ज्वल प्रगती करेल. याप्रसंगी मुंबई सहकार बोर्डावर संचालकपदी निवड झाल्याबद्दल संस्थापक-संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी यांचां सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, भीमराव बोराडे, बाळासाहेब मोहिते, सखाराम संकपाळ, जयवंत खामकर, सोपान बोराडे, अशोक तुपे, बबन काटे यांच्यासह सर्व संचालकांनी ठेव संकलन प्रतिनिधी उपस्थित होते.